MHBU190000021995	नियमीत दरखास्त २००००४/२००९ शिवाजी मूरकूट विरूध्द शंकर मुरकूट

नि. क्र. १२५ खालील आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता चे आदेश २१ नुसार रे.दि.मु. क्र. ६३५/१९८८ मधील हुकुमनाम्याविरूद्ध रे. दि.मु. क्र. ६३५/१९८८ मधील निकाल व हुकुमनामा रद्द होऊन ताबा वारंट स्थगिती करीता तसेच हरकतदाराची मालकी ताबा जाहीर होण्यासाठी सदरचा अर्ज सादर केला आहे.

०२. **अ–** हरकतदार यांचे थोडक्यात कथन असे की, हरकतदार यांनी मौजे डोरव्ही ता. सिंदखेड राजा जि. बुलडाणा येथील गट नंबर ९६ मधील ९ हेक्टर ५७ आर ११ रू. ३४ पैसे हिस्सा ४ हेक्टर ३४ आर पैकी २० आर जमीनीच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत.

पुर्वेस – गुलाबराव शामराव मुरकुट यांची जमीन

पश्चिमेस – सागर केशव मुरकुट यांची जमीन

उत्तरेस – सरकारी रस्ता

दक्षिणेस – नारायण गायकवाड यांची जमीन

वर नमुद केलेल्या चतु:सिमेच्या आतील ० हेक्टर २० आर शेतजमीन ही हरकतदार १ च्या मालकीची व ताब्यातील शेतजमीन आहे, त्यास यापुढे हरकतीतील शेतजमीन संबोधण्यात येत आहे.

०३. **ब–** मौजे डोरव्ही ता. सिंदखेड राजा जि. बुलडाणा येथील गट नंबर ९६ मधील ९ हेक्टर ५७ आर ११ रू. ३४ पैसे हिस्सा ४ हेक्टर १४ आर पैकी २० आर जमीनीच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत.

पुर्वेस – धनंजय एकनाथ मुरकुट यांची जमीन

पश्चिमेस – श्रीकृष्ण देवराव शेळके यांची जमीन

उत्तरेस – वसंत रामभाऊ मुरकुट यांची जमीन

दक्षिणेस– नारायण गायकवाड यांची जमीन

वर नमुद केलेल्या चतु:सिमेच्या आतील ० हेक्टर २० आर शेतजमीन ही हरकतदार २ च्या मालकीच्या व ताब्यातील शेतजमीन आहे, त्यास यापुढे हरकतीतील शेतजमीनीस वादमिळकत म्हणुन संबोधण्यात येत आहे.

०४. हरकतदार क्र. १ यांनी अर्ज कलम १–अ मधील शेतजमीन ही दिनांक २२/०१/२०२५ रोजी रू.१,२७,०००/– च्या मौल्यवान भरण्याने गैरअर्जदार धनंजय मुरकुट याच्याकडुन नोंदणीकृत खरेदीखताप्रमाणे विकत घेतली आहे व त्याप्रमाणे ते मालक झाले आहे, तसेच सदरची जमीन ही वहितीत व ताब्यात आहे. तसेच हरकतदार २ यांनी दिनांक ११/०४/२०२५ अर्ज कलम १–ब मधील शेतजमीन ही दिनांक ११/०४/२०२५ रोजी रू.१,९२,०००/– च्या मौल्यवान भरण्याने गैरअर्जदार धनंजय मुरकुट याच्याकडून नोंदणीकृत खरेखताप्रमाणे विकत घेतली, तेव्हापासून हरकतदार हे सदरच्या शेतजमीनीचे मालक झाले व सदर जमीन ही वहितीत व ताब्यात आहे.

०५. हरकतदाराने वादातील जमीन धनंजय एकनाथ मुरकुट कडुन विकत घेण्याच्या सौदा झाल्याबाबत डिक्री होल्डर शिवाजी मुरकुट यास माहिती होती. सदर शेतजमिनीच्या खरेदीखत होईपावतो शिवाजी मुरकुट याने कोणतीही हरकत न्यायालयात घेतली नाही व आक्षेप नोंदविला नाही, त्यामुळे हरकतदार यांना सदर वादमिळकतीविषयी काहीही माहिती नव्हती. हरकतदाराने धनंजय एकनाथ मुरकुट याच्याकडुन मौल्यवान भरण्याने वादातील जमीन विकत घेतली. हरकतदार यांना सदर वादमिळकती विषयी कोणतीही कल्पना नव्हती. हरकतदार हे बानाफाईड परचेसर आहे. हरकतदार यांना जुन २०२५ महिन्यात वादविषयी संबधी न्यायालयात खटला प्रलंबित असल्याचे माहिती पडले. गावातील लोकांकडून हरकतदारांना माहिती मिळाली की, हरकत अर्जातील जमीन ही डिक्री होल्डर यांना न्यायालयात ताबा मिळणार असल्याची माहिती मिळाली, त्यामुळे हरकतदाराने आवश्यक ते सर्व कागदपत्र गोळा करून, सदर दरखास्त विरूद्ध व न्यायानिर्णयाविरूद्ध स्थगिती

मिळण्यासाठी, न्यायनिर्णय व हुकुमनामा यास स्थगिती मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०६. मुळ मालक यांनी सर्वे नंबर २४/२ मधील सध्याचा गट नंबर ९६ मधील जमीन बऱ्याच व्यक्तींना विक्री केली आहे. हरकतदार यांना सदर हुकुनाम्याविरूद्ध स्थगिती न मिळाल्यास त्यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे, त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा. तसेच हरकतदार हे बोनाफाईड परचेसर आहेत. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली की, दिनांक २२/११/१९९१ चा निकाल व हुकुमनामा रद्द करून, तसेच रे.द.मु.६३५/१९८८ चे अंमलबजावणी च्या चतु:सीमा निश्चित नसल्याने हुकुमनामा, अंमलबजावणी व ताबा वारंट स्थगित करणे, तसेच हरकतदाराची मालकी जाहीर होण्यासाठी, तसेच रे.द.मु.६३५/१९८८ मधील निकाल हुकुमनामा रद्द होण्याचा आदेश मिळण्यासाठी हरकतदारांनी विनंती केली.

०७. सदर हरकतीच्या अनुषंगाने गैरहरकतदार मुळ डिक्री होल्डर क्र. १ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. १३१ वरती सादर केले. त्यांनी हरकतदाराने घेतलेल्या हरकतीमधील मजकुर नाकबुल असल्याचे नमुद केले. त्यांनी सदर हरकतीस तिव्र विरोध दर्शविला. त्यांनी असे नमुद केले की, गैर हरकतदार (मुळ धनको डी.एच.) यांनी त्यांचे म्हणणे नि. क्र. १२५ च्या अनुषंगाने नि. क्र. १३१ वरती सादर केले आहे. त्यांनी हरकतदाराच्या अर्जामधील मजकुर नाकबुल असल्याचे नमुद केले. तसेच सदरची हरकत ही कायद्याच्या अनषंगाने प्रतिपालनिय नाही असे नमुद केले. त्यांनी असे नमुद केले की, सदर हरकत ही हरकतदाराने ऋणको (जे.डी.) यांच्या संगणमताने हेतुपुरस्कर हुकुमनाम्याची अंमलबजावणी लांबविण्याच्या उद्देशाने सदर अर्ज हा दाखल केला आहे. हरकतदार हे बोनाफाईड परचेसर नाहीत. डोरव्ही गाव हे लहान आहे, त्याची लोकसंख्या ही १००० ते १५०० आहे. गावातील प्रत्येक व्यक्तीला दरखास्तची माहिती आहे. गावातील दहा लोकांना दरखास्तच्या नोटीसा दिल्या आहे. ताबा द्यावा लागेल ही माहिती ऋणको (जे.डी.) यांना माहिती असल्याने ते तथाकथीत पोकळ बिनभरवशाचे खरेदीखत करून हरकत अर्जदाराच्या माध्यमातुन सदर अर्ज हा संगणमताने करण्यात आला आहे. हरकतदाराच्या ताब्यात जमीन नाही. हरकतदाराचे ऋणको (जे.डी.)

यांचे घनिष्ट संबंध आहेत. सदरचा अर्ज हा सादर केला आहे, त्यामुळे तो खारीज होण्यास पात्र आहे.

०८. तसेच त्यांनी असे नमुद केले की, शंकर आश्रुबा मुरकुट हे मयत झाले आहे, त्यांचा वारस नातु धनंजय मुरकुट याच्या ताब्यात संपूर्ण जमीन होती. त्याने हेतुपुरस्सरपणे हुकुमनाम्याची बजावणी लांबणीवर टाकण्याचे उद्देशाने विक्री केली, धनंजय एकनाथ मुरकुट व शंकर आश्रुबा मुरकुट यांनी दाव्यातील जमीनीपैकी काही जमीन निकाल लागल्यानंतर व दरखासत प्रकरण प्रलंबित असतांना निरनिराळ्या लोकांना विक्री केली आहे, त्या सर्वांना डि.एच ने दरखाास्तमध्ये गैरअर्जदार केले आहे, तसेच सर्वाविरूद्ध आदेश २१ नियम ३५ दिवाणी प्रक्रिया संहितेप्रमाणे उभ्या पिकासह व घरासह ताबा वारंट काढण्याचा अर्ज दाखल केला आहे. डी.एच चा ताबा वारंट डि. एच यांना मिळाला आहे, तसेच ताबा वारंटची माहिती गावातील सर्व लोकांना आहे. लीज पेंडंन्टच्या तत्वानुसार हरकतदाराने विकलेल्या जमीनीचे खरेदीखत डिक्री होल्डरला बंधंनकारक नाही. सदर खरेदीखत हे दरखास्त प्रलंबित असतांना झाले आहे, त्यामुळे सदर खरेदीखत हे पोकळ आहे. तसेच माननिय मुंबई उच्च न्यायालय यांनी विष्णू त्र्यंबक मुरकुट यांनी केलेला अर्ज हा खारीज केला आहे, त्यामुळे सदरचा अर्ज हा प्रतिपालनिय नाही, त्यामुळे सदरचा अर्ज हा खारीज करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०९. निशाणी क्र. १२५ च्या अनुषंगाने गैरहरकतदार यांना नोटीसेस काढल्या. गैरहरकतदार विष्णु मुरकुट, मथुराबाई मुरकुट, शालीकराम भुतेकर, भिकुबाई मुरकुट, सागर मुरकुट हे त्यांच्या विधिज्ञांमार्फत हजर झाले, परंतू त्यांनी त्यांचे म्हणणे सादर केले नाही, त्यामुळे न्यायालयाने सदर अर्ज हा विना म्हणणे पुढे चालविला, तसेच इतर हरकतदारांना नोटीसेस लागुन त्यांनी त्यांचे म्हणणे सादर केले नाही, त्यामुळे सदर हरकत ही त्यांच्याविरूद्ध एकतर्फी चालविण्यात येत आहे.

१०. हरकतीच्या अनुषंगाने खालील विचाराधीन प्रश्न उपस्थित होत आहेत व मी त्याचे निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

अ. क्र.	विचाराधीन प्रश्न	निष्कर्ष
०१	दिनांक २२/११/१९९१ चा हुकुमनामा रद्द होण्यास पात्र आहे का ?	नाही
०२	हरकतदार हे हुकुनाम्याविरूद्ध स्थगिती मिळण्यास पात्र आहेत का ?	नाही
०३	हरकतदार वादमिळकतीवरील मालकी जाहीर होण्यासाठी तसचे रे. द.मु. ६३५/१९८८ मधील निकाल हुकुमनामा रद्द होण्यास पात्र आहे का ?	नाही
०४	प्रस्तुतचा हरकतदाराचा अर्ज हा प्रतिपालनिय आहे का?	नाही
०५	आदेश काय ?	अंतिम आदेशाप्रमाणे

११. अभिलेखाचे अवलोकन केले,हरकतदार यांनी त्यांच्यावतीने युक्तीवाद सादर केला नाही, त्यामुळे हरकतदार यांनी दाखल केलेला हरकत हाच त्यांचा युक्तीवाद समजण्यात येत आहे. तसेच गैरअर्जदार क्र. १ शिवाजी मुरकुट यांचे विधिज्ञ श्री. जी.पी.भाला यांनी सविस्तर युक्तीवाद सादर केला. तसेच गैरहरकतदार क्र. २ ते १० यांच्याविरूद्ध न्यायालयाने विना म्हणणे व एकतर्फी आदेश पारीत करून सदर अर्ज पुढे चालविला.

<u>कारणमिमांसा</u>

विचारधीन प्रश्न क्र. १ ते ४ ची बाबत :–

१२. विचाराधीन प्रश्न १ ते ४ एकमेकांशी निगडीत असल्याने मी त्याची चर्चा एकत्रीतपणे करीत आहे व त्याप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसुन येते की, मुळ वादी शिवाजी मुरकुट यांनी प्रतिवादी शंकर आश्रुबा मुरकुट यांच्याविरूद्ध २२/११/१९९१ रोजीचा न्यायनिर्णय हुकुमनाम्याची अंमलबजावणी होण्याकरीता सदर दरखास्त दाखल केली आहे. सदर दरखास्त मध्ये जजमेंन्ट डेटर यांनी

बऱ्याच लोकांना गट नंबर ९६ मधील शेतजमीन विक्री केल्याचे दिसुन येते. तसेच धनंजय एकनाथ मुरकुट याचेसुद्धा दरखास्तमध्ये नाव आहे. जजमेंन्ट डेटर विष्णू मुरकुट यांनी शिवाजी मुरकुट यांच्याविरूद्ध माननिय बॉँम्बे हाय कोर्ट बेंच नागपुर यांच्या विरूद्ध रिव्हीजन अर्ज दाखल केला होता. माननीय बॉम्बे उच्च न्यायालय यांचे खंडपीठ यांनी सदरचा रिव्हीजन नामंजूर केली होती. तसेच न्यायालयाने वेळोवेळी डिक्री होल्डर यांना आदेश २१ नियम ३५ दिवाणी प्रक्रिया संहितेप्रमाणे ताबा वारंट जारी केला होता. तसेच सदर दरखास्त ही १९९१ सालची आहे.

१३. हरकतदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये असे नमुद केले की, दिनांक २२/११/१९९१ चा न्यायनिर्णय व हुकुमनामा रद्द करण्यासाठी विनंती केली. सदर हरकतदाराने घेतलेली हरकत ही प्रतिपालनिय नाही. दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम ९६ हे मुळ न्यायालयाने दिलेल्या न्यायार्णियापासुन अपील दाखल करण्याबाबत आहे. सदरचे न्यायालय हे मुळ न्यायालय आहे व दरखास्त अमंलबजावणी करणारे न्यायालय आहे. या न्यायालयास स्वत:चा न्यायनिर्णय रद्द करण्याचा अधिकार क्षेत्र येत नाही. दिवाणी न्यायालय क. स्तर यांनी दिलेला न्यायनिर्णय हा त्यांचे वरीष्ठ न्यायालय अपिलीय न्यायालय यांना रद्द करण्याचा अधिकार आहे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांनी दिलेला न्यायनिर्णय त्यांना स्वत: रद्द करण्याचा अधिकार नाही. हरकतदार यांनी घेतलेली हरकत ही न्यायनिर्णय व हुकुमनामा रद्द करण्याच्या अनुषंगाने प्रतिपालनिय नाही.

१४. हरकतदार यांनी असे नमुद केले की, त्यांनी धनंजय मुरकुट यांच्याकडुन गट नंबर ९६ मधील २०–२० आर शेतजमीन नोंदणकृत खरेदीखताने विकत घेतली आहे. परंतू हरकतदार हे डोरव्ही या गावचे आहेत. हरकतदार यांनी धनंजय मुरकुट यांच्याकडुन गट नंबर ९६ मधील २०–२० आर शेतजमीन दिनांक २२/०१/२०२५ रोजी व दिनांक ११/०४/२०२५ रोजी विकत घेतल्याचे दिसुन येते. धनंजय मुरकुट यांना दरखास्तची सर्व कल्पना आहे. तरीसुद्धा धनंजय मुरकुट यांनी हरकतदारांना गट नंबर ९६ मधील शेतजमीन विक्री केली, तसेच हरकतदार यांनी हुकुमनामा प्रलंबित असतांना ऋणको धनंजय मुरकुट यांच्याकडुन सदर गटातील शेतजमीन खरेदीखताने विकत घेतली. सदर ची दरखास्त ही १९९१ सालची आहे.

दिवानी प्रक्रिया संहिता आदेश २१ नियम १०२ अन्वेय दावा प्रलबिंत असताना ज्याच्याकडे हस्तानतर करण्यता आले त्या हस्तातरनाला नियम लागु नसने असे नमुद करते.

ज्या दाव्यामध्ये हुकुमनामा देण्यात आला तो दावा दाखल करण्या करीता आल्या नंतर न्यायार्णियनीयत ऋणको ने जीच्याकडे मालमत्ता हस्तातरीत केली असेल, अशा व्यक्ती कडून स्तावर मालत्तेच्या कबज्ञयाच्या हुकूनाम्याच्या अमंल बजावणीस होणारा प्रतिकार किंवा अडथळा किंवा कोणत्याही व्यक्तीला बे दखल केले जाणे याबाबत नियम ९८ व १०० मधील कोणतीही गोष्ट लागु होणार नाही.

स्पष्टीकरण या नियमात "हस्तांनतर" या सज्ञेत कायदयाच्या प्रर्वतणामुळे होणारे हस्तातंरन समाविष्ठ आहे.

१५. प्रस्तुत प्रकरणामध्ये हरकतदार यांनी धनंजय मुरकूट यांच्या कडुन दरखास्त प्रलबिंत असताना वादातील जमिन विकत घेतली. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २१ नियम १०२ प्रमाणे लिज पेंडन्सी या तत्वाच्या अनुषंगाने हरकतदार यांची हरकत प्रतिपालनिय नाही, कारण सदर हरकतदाराने दरखासत प्रलंबित असतांनी वादातील जमीन विकत घेतली आहे.

१६. हरकतदाराने त्यांच्या हरकत अर्जामधील परिच्छेद ४ मध्ये असे नमुद केले की, वादमिळकत विकत घेण्याचा सौदा झाल्याबाबत डि.एच शिवाजी मुरकुट यास माहिती होती. सदर शेतजमीनीची खरेदी होइपावतो डि. एच. याने हरकतदारांना कोणत्याही कोर्ट कार्यवाही बाबत माहिती दिली नाही किंवा कोणत्याही प्रकारे आक्षेप घेतला नाही, असे नमुद केले. सदरील मजकुरावरून असे लक्षात येते की, हरकतदार यांना धनंजय मुरकुट यांच्या शेतजमीनीची पूर्व माहिती होती. हरकतदाराने जाणीवपूर्वक वादातील जमीन विकत घेतल्याचे दिसुन येते.

माननीय बॉम्बे उच्च न्यायालय यांनी ***बजरंग @ हनुमंत तातेबा काकडे विरूद्ध बाबूभाई बाबूराव पुजारी १९९७ एस.एस.सी. ऑनलाईन बॉम्ब ९८*** *या न्यायनिर्णयामध्ये माननीय बॉम्बे उच्च न्यायालय यांनी दरखास्त प्रलंबित असतांनी जर दरखास्तमधील संपत्ती चौकशीविना विकत घेतली असेल तर, विनाचौकशी विकत घेणाऱ्या व्यक्तीला बोनाफाईड परचेसर म्हणता*

येणार नाही, असे माननीय न्यायालयाने या न्यायनिर्णयामध्ये नमुद केले. माननीय बॉम्बे उच्च न्यायालय यांनी परिच्छेद ७ मध्ये नमुद केले की, विकत घेणाऱ्या व्यक्तीने संपूर्ण संपत्तीची पूर्व माहिती व पूर्व चौकशी करणे आवश्यक आहे. संपूर्ण माहिती घेवून व चौकशी करून, जर संपत्ती विकत घेतली असेल तर अशा व्यक्तीला बोनाफाईड परचेसर म्हणता येईल, परंतू ज्या व्यक्तीने संपत्तीची कोणतीही पूर्व माहिती न घेता ती विकत घेतली असेल तर, अशा व्यक्तीला बोनाफाइड परचेसर म्हणता येणार नाही, असे या न्यायनिर्णयाने नमुद केले.

१७. प्रस्तुत प्रकरणामध्ये हरकतदार यांनी कोणतीही चौकशी न करता सदर प्रकरणातील गट नंबर ९६ मधील शेतजमीन विकत घेतली आहे. ती शेतजमीन दरखास्त प्रलंबित असतांना विकत घेतली आहे. हरकतदारांनी दैनिक वृत्तपत्रामध्ये जमीन विकत घेणेबाबतचा दस्त दाखल केला नाही, तसेच असा कोणताही दस्त हरकतदाराने अभिलेखावरू दाखल केला नाही, ज्यावरून हे लक्षात येईल की, हरकतदार यांनी दरखास्तमधील गट नंबर ९६ मधील शेतजमीन विकत घेण्यापूर्वी शहानिशा व पूर्व चौकशी केली, त्यामुळे हरकतदार यांनी घेतलेली हरकत ही प्रतिपालनिय नाही.

१८. हरकतदार हे एकाच गावातील रहिवाशी असल्याने, तसेच हरकतदार यांनी सदर हरकतीमधील शेतजमीनीची कोणतीही पूर्व चौकशी न करता सदर वादातील जमीन विकत घेतली आहे, त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश २१ निमय १०२ अन्वये प्रस्तुत प्रकरणामध्ये लागू पडते. तसेच हरकतदार यांनी धनको यांच्या ताब्यास घेतलली हरकत ही प्रतिपालनिय नाही. हरकतदार हे बोनाफाईड परचेसर नाही. तसेच हरकतदार यांनी बोनाफाईड परचेसरच्या अनुषंगाने कोणताही दस्त अथवा पुरावा न्यायालयासमोर आणला नाही. तसेच दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २१ नियम १०२ हे हरकतदारांना लागू पडते. त्यामुळे हरकतदाराने घेतलेला धनको यांना देण्याच्या ताब्याची हरकत ही प्रतिपालनिय नाही.

१९. हरकतदार यांनी मागणी केलेल्या स्थगिती करीता हरकतदार यांना कोणतेही कारण नाही. हरकतदार हे बोनाफाईड परचेसर नाही. त्यामुळे हरकतदार हे सदर दरखास्तीस स्थगिती मिळणयास पात्र नाही. सदरची दरखास्त ही १९९१ सालची आहे. त्यामुळे

हरकदारानी सदर स्थगिती केलेली मागणी प्रतिपालनिय नाही. हरकतदाराने गैरहरकतदार २ ते १० यांना सदर हरकतीमध्ये समाविष्ट केले आहे. यावरून असे दिसुन येते की, हरकतदार यांना सदर दरखास्त प्रलंबित असल्याची माहिती होती, तरीसुद्धा हरकतदार यांनी धनंजय मुरकुट यांच्याकडून सदर शेतजमीन विकत घेतल्याचे दिसुन येते. तसेच गैरहरकतदार २ ते १० हे या दरखास्तमध्ये ऋणको आहेत. त्यांना दरखास्तची पूर्ण माहिती आहे. तसेच माननिय बॉम्बे उच्च न्यायालय नागपूर यांनी विष्णू मुरकुट यांनी दाखल केलेली रिव्हीजन अर्ज नामंजूर केला आहे.

२०. हरकतदार १ व २ हे बोनाफाईड परचेसर नसल्याने त्यांना जाहीरनामा व मालकी जाहीर होण्यास ते पात्र नाहीत. हरकतदार यांनी सदर दरखास्तीच्या अनुषंगाने वादातील जमीन विकत घेतली याची पूर्व माहिती व चौकशी केली नाही. त्यामुळे हरकतदार हे खरेदीखताप्रमाणे मालक म्हणून जाहीर होण्यास पात्र नाही. तसचे हरकतदाराचा अर्ज हा प्रतिपालनिय नाही. हरकतदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१ नियम १०२ अन्वये वादातील जमीन दरखास्त प्रलंबित असतांना विकत घेतली आहे, त्यामुळे हरकदाराची हरकत प्रतिपालनिय नाही.

२१. मा.बॉम्बे उच्च न्यायालय यांनी ***अलका श्रीरंग चव्हाण विरूध्द हे हेमचद्र भोसले २४ एस.एस.सी ऑनलाईन बॉम्ब ५६२३*** *या न्यायार्णियमुळे असे नमुद केले की, दरखास्त प्रलबिंत असताना ऋणको यांनी वादातील जमिन विक्री केल्यास लिस पेंण्डस हे तत्व सदर विक्री व्यवहारास लागु पडते आणि ऋणको यांच्या वतीने मालकी हक्क सांगणा–या व्यक्तीला हक्क ऐणार नाही व तो बोनाफाईड परचेसर होणार नाही. असे मा. बॉम्बे उच्च् न्यायालय यांनी न्यायार्णियामध्ये नमुद केले .*

२२. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांनी ***उषा सिंन्हा विरूध्द दिना राम (२००८) ७ सुप्रीम कोर्ट केसेस १४४*** *या न्यायर्णियामध्ये मा. सर्वोच्च न्यायालय यांनी असे नमुद केले की, लिस पेंडण्स चे तत्वानुसार ऋणको यांनी वादातील जमिन दरखास्त प्रलबिंत असताना विक्री केली असेल तर, विकत घेणार व्यक्ती याला कोणताही स्वतंत्र अडथळा किंवा हरकत दाखल*

करण्याचा अधिकार ऐणार नाही. असे मा. सर्वोच्च न्यायालय यांनी या न्यायनिर्णयामध्ये नमुद केले.

२३. प्रस्तुत दरखास्त मध्ये हरकतदार हे बोनाफाईड परचेसर नाहीत त्यामुळे हरकतदाराची हरकत ही प्रतिपालनीय नाही. तसेच धनको यांनी व न्यायालयाने त्यांच्या दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये गट नं. ९६ च्या अनुशंगाने न्यायनिर्णयामध्ये चतु:सिमा नमूद आहे त्यामध्ये असे नमूद केले की, उत्तरेकडील ०३ हे. ९१ आर या जमिनीचा ताबा धनको शिवाजी मुरकूट यांना देण्यात यावा असे नमूद केले. त्यामुळे धनको यांनी दरखास्तमध्ये चतु:सिमा नमूद केले नाही. असे म्हणता येणार नाही. हरतदाराने घेतलेली हरकत ही प्रतिपालनीय नाही. प्रस्तुत न्यायालयाला दरखास्त व न्यायनिर्णय रद्द करण्याचे अधिकारक्षेत्र नाही. तसेच हरकदार हे बोनाफाईड परचेसर नाहीत. त्यामुळे हरकतदाराची मालकी जाहिर होण्यास ते पात्र नाहीत. तसेच हरकतदार यांनी वादातील जमीन ही दरखास्त प्रलंबित असतांना धनंजय मुरकूट याच्या कडून विकत घेतली आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१ नियम १०२ प्रमाणे हरकतदार व शंकर मुरकुट यांचा खरेदीचा व्यवहार असल्याने लिस पेंडन्स हे तत्व लागु पडते. त्यामुळे हरकतदार हे हुकूमनाम्यास स्थगीती मिळण्यास पात्र नाहीत व हरकतदाराची हरकत ही प्रतिपालनीय नाही. त्यामुळे वरील चर्चेअंती मी विचाराधीन प्रश्न क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे व खालील आदेश पारीत करत आहे.

<u>आदेश</u>

०१. नि. क्र. १२५ हा नामंजूर करण्यात यतो.

PRAFUL BHARAT TELGOTE
Digitally signed by PRAFUL BHARAT TELGOTE
Date: 2026.02.26 11:28:16 +0530

दिनांक: १६/०२/२०२६ (प्रफुल बी. तेलगोटे)

स्थळ : सिंदखेड राजा सह–दिवाणी न्यायाधीश, क–स्तर,

सिंदखेड राजा